पुणे शहर पोलीस

# दर्पण

सप्टेंबर २०१९

# अभिप्राय...

'दर्पण' पुस्तकाबाबत..

मी पोना 6532 कुमार, नेमणूक वानवडी पो.स्टे.

सध्या मी वानवडी पो.स्टे. येथे डी.ओ./ठाणे अंमलदार म्हणून कर्तव्य करित आहे. पुण्याचे पोलीस आयुक्त श्री. के. के. व्यंकटेशम सर यांनी पोलीस दलाची जनमानसात प्रतिमा उंचावण्यासाठी 'दर्पण' पुस्तकाची संकल्पना सुरु केली आहे. या दर्पण पुस्तकामध्ये पोलीस अधिकारी / व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामाचा गौरव फोटो सहित छापला गेला त्यामुळे समाजातील लोकांना पोलीस सुध्दा चांगले काम करतो आहे याची जाणीव होवू लागली आहे. त्यामुळे पोलीसांची प्रतिमा चांगली होण्यास मदत झाली आहे. दर्पण पुस्तकामध्ये पोलीसांचे कामाचा चांगल्या कामाचा गौरव केला जातो हे पाहून इतर पोलीस बांधव हे सुध्दा चांगले काम करण्याची इच्छा बाळगून चांगले काम करणे बद्दल [illegible] प्रयत्न करतात.

'दर्पण' पुस्तक खरोखरच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या गौरवाचे पुस्तक आहे असे मला वाटते.

पोना 6532 कुमार [illegible]
वानवडी पो.स्टे. पुणे

**गुडवर्क व दर्पण या पुस्तका बाबत अभिप्राय**

पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामास (Good Work) वर्तमान पत्रात प्रसिध्दी देण्याचा व वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेल्या कात्रणांपासून तयार केलेले दर्पण हे पुस्तक नागरिकांना पाहणेसाठी पोलीस स्टेशन स्तरावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. हा उपक्रम हा अत्यंत चांगला आहे.

या उपक्रमामुळे पोलीस अधिकारी व कर्मचारी हे दैनंदिन कर्तव्या दरम्यान स्वयंस्फुर्तीने चांगले काम करण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे. तसेच अशा केलेल्या चांगल्या कामाची माहिती ही पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे व्हॉटसॲप ग्रुप्सवर प्रसिध्द होत असल्याने त्याबाबत इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून शुभेच्छा देण्यात येतात त्यामुळे चांगले काम केलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो तसेच इतरांना चांगले काम करण्याची व त्यास प्रसिध्दी देण्याची ईर्शा निर्माण होते.

तसेच दर्पण हे पुस्तक येरवडा पोलीस स्टेशन येथे येणारे नागरिक वाचतात व पोलीसांचे चांगले कामाबद्दल चर्चा करतात. तसेच पोलीसांचे कामाबद्दल लोकांमध्ये विश्वास निर्माण होत आहे. वर्तमान पत्रातील चांगल्या कामाचे प्रसिध्दी मुळे नागरिक समक्ष भेटून अभिनंदन व शुभेच्छा देतात. त्यामुळे एकप्रकारे चांगला अनुभव मिळतो व त्यातून अधिक चांगले काम करण्यासाठी प्रेरणा मिळत आहे. सदरचे उपक्रम हे अत्यंत चांगले असून ते यापुढेही कायमस्वरूपी चालू ठेवावेत.

( शुभांगी मगदुम )
महिला पोलीस उप निरीक्षक
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे

# उत्कृष्ट तपास

उत्कृष्ट तपास

The Indian EXPRESS - 1 September, 2019

# Interstate gang held for cheating people by offering dollars, antiques at lower price

EXPRESS NEWS SERVICE
PUNE, AUGUST 31

The Pune City Police has arrested an interstate gang of four persons, including a woman and her son, for allegedly cheating people by making fraudulent offers of providing American dollars and antique objects at low prices.

Police have identified the suspects as Kabir Salim Shaikh (29) of Yerwada and a native of Jharkhand, Mustafa Shahwali Shaikh (31) of Yerwada and a native of Uttar Pradesh, Salman Alam Shaikh (26) and his mother Nasima Begam Mohammed Mukim (48), both residents of Yerwada and natives of Bihar.

A police probe has so far showed that the gang is involved in five cheating cases, including one registered at Khadki police station in which they allegedly duped Kishor Shantaram Garud (28), resident of Kothrud, to the tune of Rs 1.18 lakh on July 31, 2019.

According to police, Garud came in contact with the accused while having tea near a hospital in Khadki area.

Police said the accused lured him by giving assurances of providing American dollars at low prices. But after accepting cash of Rs 1,18,500 from him, the accused tricked him and gave him washing soap covered with bundles of newspaper rolls and fled from the spot, police added.

During the investigation, police got clues about the accused from CCTV footage and then, acting on a tip-off to Havildar Uttam Kadam and Constable Sandip Gaikwad, a team led by Senior Inspector Bhagwat Misal, Inspector Shafil Pathan, Sub-Inspector Pratap Giri laid a trap and nabbed the four accused persons in Khadki Bazaar area on August 29.

During a search, police recovered a currency note of one dollar, 14 currency notes of 20 dollars, soap, 11 mobile phones, nine SIM cards and other items worth Rs 43,840 from them.

Police said they had deposited the money that earned by cheating people into different bank accounts. Police have seized Rs 2.19 lakh from different bank accounts.

In a press conference on Saturday, Deputy Commissioner of Police (Zone IV) Prasad Akkanavaru said further investigation was on and there was a possibility that more cases will be solved.

Police said the accused would approach traders, vegetable vendors, vehicle drivers with offers of giving them dollars at low prices.

Initially, they gave one dollar as a sample saying they had more such currency notes and wanted to exchange them with Indian currency, police added.

Police further said to gain people's trust, they asked the to get the sample note checked from the bank.

But later, after accepting Indian currency, they would trick them and instead of giving the currency, they cheated people by handing over soap wrapped in paper, police added. In June this year, the Faraskhana police station team had arrested a gang of four persons, who were similarly cheating people by making fraudulent offers of dollars.

Police had then alerted that there were six different gangs comprising 45 persons hailing from different states, who were allegedly committing similar crimes in the city.

लोकमत – दि. ८ सप्टेंबर, २०१९

### मैत्रिणीच्या घरावर मारला डल्ला । अवघ्या १२ तासांत लावला छडा

# फेसबुक मित्र निघाला अट्टल चोर

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** भर दिवसा केवळ पाऊण तासामध्ये घराचे लॉक अथवा कडी कोयंडा न तोडता घरात शिरून मोठी चोरी झाली होती. सोसायटीचे सीसीटीव्ही बंद होते. अशी सर्व परिस्थिती असताना पोलिसांनी १२ तासांत गुन्हेगाराला पकडून त्याच्याकडून चोरलेला तब्बल १२ लाखांचा ऐवज जप्त केला. अधिक चौकशीत महिलेशी फेसबुकवरून झालेल्या मैत्रीचा फायदा घेऊन त्याने मैत्रिणीच्या घरावरच डल्ला मारल्याचे उघडकीस आले आहे.

नीलेश शरद तावरे (वय २९, रा. अक्षय निवास अपार्टमेंट, शाहुपुरी, सातारा) असे त्याचे नाव आहे. तावरे हा अट्टल चोरटा असून त्याच्यावर वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात ३३ गुन्हे दाखल आहेत. वेगवेगळ्या जिल्ह्यात १५ वाहनचोरीचे, ६ घरफोडी चोरी, २ जबरी चोरी आणि एक दरोड्याची तयारी असे गुन्हे आहेत.

त्यामुळे फेसबुकवरुन पोलिसांनी त्याची सर्व माहिती काढली. त्याच्या मोबाईलच्या लोकेशनवरुन त्यावेळी तो सातारा येथे असल्याची माहिती मिळाली. पोलिसांचे एक पथक तातडीने सातारा येथे गेले. त्यांनी त्याच्या मित्रांना ताब्यात घेतले. त्याआधारे नीलेश तावरे याला पकडण्यात आले. त्याने चोरलेल्या ऐवजापैकी ३० तोळे सोने, जवळपास १ किलो चांदी, मोटारसायकल, रोख रक्कम व तीन मोबाईल असा ११लाख ९३ हजार ६५८ रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. चोरीचा गुन्हा दाखल केल्यानंतर अवघ्या १२ तासांत पोलिसांना त्याचा छडा लावण्यात यश आले आहे.

ही कारवाई अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, पोलीस उपायुक्त बच्चनसिंह, सहायक आयुक्त शिवाजी पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्ता चव्हाण, उपनिरीक्षक सोमनाथ शेंडगे, तसेच संतोष मोहिते, महेश वाघमारे, दत्तात्रय काटम, अमजद पठाण, राजेश रणसिंग, राजभाऊ भोरडे, बडू शिंदे, प्रदीप सुर्वे, सचिन घोलप, दया शेंगर, प्रमोद गायकवाड, प्रविण काळभोर यांनी केली आहे.



आरोपीसह तपास करणारे पोलीस पथक.

### सीसीटीव्हीवरुन चित्र

१ आरोपी अमित कार्डिले (वय ४०, रा. धवलगिरी सोसायटी, बिबवेवाडी, कोंढवा रोड) यांनी मार्केटयार्ड पोलिसांकडे फिर्याद दिली होती. चोरट्यांनी ६ सप्टेंबर रोजी दुपारी १२ ते १२.४५ यावेळेत घरात प्रवेश करुन बेडरुममधील कपाटातील सोन्याचे दागिने, रोख रक्कम असा १४ लाख ४० हजार रुपयांचा ऐवज चोरुन नेला होता. केवळ एक तासात व चावीचा वापर करुन ही चोरी झाली होती.

२ केवळ हा एकच धागा पकडून गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दत्ता चव्हाण यांनी तपास सुरु केला. सोसायटीचे सीसीटीव्ही बंद होते. सोसायटीतील एका बंगल्याच्या बाहेरच्या सीसीटीव्हीमधील काही फुटेज त्यांना मिळाले. त्यावरुन संशयिताचे चित्र मिळाले. त्यात महिलेची फेसबुकवरुन मैत्री झाली होती असे निष्पन्न झाले.

# चॅटिंगच्या पुराव्यामुळे सापडला आरोपी




## फेसबुकवरून पोलिसांनी पटवली ओळख

Shrikrishna.Kolhe
@timesgroup.com
Tweet : @ShrikrishnaMT

**पुणे :** गुन्हा केल्यानंतर पुरावे सापडू नयेत, म्हणून आरोपीने कितीही काळजी घेतली तरी तंत्रज्ञानाच्या साह्याने पोलिसांना आरोपींपर्यंत पोहोचता येणे शक्य झाले आहे. मुंढव्यातील एक महिला तिच्या नातेवाइकाकडे जाते म्हणून दुचाकी घेऊन गेल्यानंतर दोन दिवसानंतरही ती परत न आल्यामुळे नातेवाइकांनी शेवटी पोलिसांकडे तक्रार दिली. पोलिसांनी महिलेच्या मोबाइल क्रमांकावरून माहिती काढल्यानंतर त्यांना एका तरुणावर संशय आला. त्या तरुणाचे फेसबुक तपासल्यानंतर दोघे मित्र असून, एकमेकांच्या संपर्कात असल्याचे समजले. त्या व्यक्तीच्या घरी सापडलेल्या मोबाइलमुळे आणि त्यातील चॅटिंगवरून त्या तरुणानेच महिलेचा खून केल्याचे निष्पन्न झाले. अत्यंत किचकट असा खुनाचा गुन्हा मुंढवा पोलिसांनी उघडकीस आणला.

मुंढवा परिसरातील पिंगळे वस्ती येथे राहणारी राधा राकेश अग्रवाल (वय ४०) ही महिला दोन दिवसांपासून घरी आली नसल्याची तक्रार तिच्या कुटुंबीयांनी पोलिस ठाण्यात दिली. राधा या त्यांच्या शिर्डी येथील एका नातेवाइकाकडे जाऊन येते म्हणून कुटुंबीयांना सांगितले होते. परंतु त्यानंतर महिलेचा फोन बंद येत होता. तसेच, नातेवाइकांनीही राधा आली नसल्याचे सांगितले. या प्रकरणी कुटुंबीयांनी 'मिसिंग'ची तक्रार दाखल केली. त्यानुसार वरिष्ठ निरीक्षक संपत भोसले यांनी तपास पथकाचे उपनिरीक्षक अमोल गवळी यांना तपास करण्याची सूचना केली. पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण, मोबाइलद्वारे आधी महिलेचा माग काढला. त्या वेळी शेवटचा फोनकॉल झालेल्या व्यक्तींवर पोलिसांचा संशय निर्माण झाला. त्या व्यक्तीची माहिती फेसबुकवरून काढली असता दोघे जण फेसबुक फ्रेंड असल्याचे दिसले. त्या व्यक्तीचे नाव आनंद शिवाजी निकम (२९) असल्याचे समजले. तो राहत असलेल्या काळेवाडी येथील घरी तो सापडला नाही.

तसेच, रेंजहिल येथील भोसलेनगर येथे त्याचा चहाचा स्टॉल असल्याचे समल्यानंतर पोलिस त्या ठिकाणी गेले. त्याच्याकडे राधा यांच्याबाबत चौकशी केली असता तो काहीही न बोलता निघून गेला. त्यामुळे पोलिसांचा संशय आणखी बळावला. त्यानंतर पोलिसांनी त्याच्या आईकडे चौकशी केली. त्या वेळी तो कुठे गेला आहे, हे माहीत नसल्याचे आईने सांगितले. मात्र, त्याच्या कारमध्ये पोलिसांना तीन मोबाइल सापडले. या तीनपैकी दोन मोबाइल राधा यांचे होते व एक त्याचा होता.

पोलिसांनी त्यामधील चॅटिंग पाहिल्यानंतर तो राधा यांना बाहेर फिरण्यासाठी घेऊन गेल्याचे दिसून आले. त्यानुसार त्याचा शोध सुरू केला.

खुनाच्या घटनेनंतर काळेवाडी परिसरातून त्याला १९ दिवसांनी अटक करण्यात आली. त्याच्याकडे चौकशी केल्यानंतर वाइल्ड लाइफ फोटोग्राफी करण्याच्या बहाण्याने तो राधा यांना ताम्हिणी घाटात घेऊन गेला आणि तेथे त्यांच्या गळ्यावर वार करून खून केल्याची कबुली त्याने दिली. राधा यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने काढून घेऊन त्यानंतर राधा यांची दुचाकी घेऊन तो परत घरी आला.



### फेसबुकवरून दोघांची ओळख

राधा यांची सहा महिन्यांपूर्वी फेसबुकवरून आनंद निकम याच्यासोबत ओळख झाली होती. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले. दोघे अधून-मधून भेटत होते. त्या वेळी राधा यांच्या अंगावर खूप सोने असायचे. ते सोने पाहूनच राधा यांचा खून करून सोने चोरण्याचा विचार त्याच्या मनात आला. आनंद याला कॅंटीनमधून नफा मिळत नसल्यामुळे त्याच्यावर कर्ज झाले होते. कर्जावरून त्याचे सतत मेव्हण्यासोबत वाद होत होते. त्यामुळे राधा यांच्या अंगावरून सोने चोरण्याचा कट आनंदने रचला. वाइल्ड लाइफ फोटोग्राफीसाठी जायचे असल्याचे एके दिवशी त्याने राधाला सांगितले. त्या वेळी आनंदने तिला ताम्हिणी येथे जाऊ असे सांगितले. तसेच, येताना सोन्याचे दागिने घेऊन येण्यास सांगितले. २२ जून २०१९ राधा घरी नातेवाइकांकडे जात असल्याचे सांगून त्याच्याकडे आली. दोघे ताम्हिणी घाटात गेले. या वेळी आनंदने जाताना कॅंटीनमधील चाकू सोबत घेतला होता. तसेच, वाइल्ड फोटोग्राफीसाठी राधाने दोरीदेखील आणली होती. घाटात तो राधा यांना जंगलाच्या आतमध्ये घेऊन गेला. त्या ठिकाणी दोरीने राधा यांचे हात-पाय बांधले. त्यानंतर चाकूने त्यांच्या गळ्यावर वार केले. तसेच, त्यांच्या अंगावरील सोने, मोबाइल घेऊन परत घरी आला, अशी कबुली त्याने पोलिसांना दिली.

**महाराष्ट्र टाइम्स** – दि. १८ सप्टेंबर, २०१९

# अपहरण करणाऱ्यांना जन्मठेपेची शिक्षा

म. टा. प्रतिनिधी, पुणे

बांधकाम व्यावसायिकाच्या दहा वर्षांच्या मुलीचे अपहरण करून ३० लाख रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी एका महिलेसह दोघांना जन्मठेप आणि प्रत्येकी दोन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली. अतिरिक्त सत्र न्यायाधीश ए. एन. सिरसीकर यांच्या कोर्टाने हा निकाल दिला. हा प्रकार अकरा वर्षांपूर्वी घडला होता.

राणी मोहन गायकवाड (वय ३१, रा. सहवास हॉल, सिंहगड रोड), सुनीलकुमार रामविकास सिंह (३४, रा. शास्त्रीनगर, उत्तर प्रदेश) या दोघांना शिक्षा सुनावण्यात आली आहे. या प्रकरणी संबंधित मुलीच्या वडिलांनी विश्रामबाग पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. हा प्रकार २००८ मध्ये घडला होता. खटल्याचे कामकाज सरकारी वकील उज्ज्वला रासकर यांनी काम पाहिले. फिर्यादी यांना ॲड. विजयकुमार सुपेकर यांनी मदत केली.

फिर्यादी हे बांधकाम व्यावसायिक आहेत. घटनेच्या दिवशी फिर्यादी सासूबाई आजारी असल्याने ते मुलीला घेऊन सदाशिव पेठेत गेले होते. त्या वेळी मुलीने त्यांच्याकडे वही आणण्यासाठी पैसे मागितल्याने त्यांनी ते तिला दिले. तसेच, शेजारी राहणाऱ्या आजींना घेऊन वही आणण्यास जा, असे त्यांनी सांगितले. वही आणण्यास गेल्यानंतर मुलीला जवळच्या दुकानात पाहिजे ती वही न मिळाल्याने ती एकटीच अन्य दुकानाच्या शोधात फिरत असताना तेथे आरोपी राणी आली. आणि वही घेऊन देण्याचे बहाण्याने तिला एका लॉजमध्ये नेले. तेथे असलेल्या साथीदार सिंह व राणीने फिर्यादींना एसटीडी बुथवरून फोन करून ३० लाख रुपयांची खंडणी मागितली. याबाबत त्यांनी पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून आरोपींना अटक केली.

या खटल्यात सरकारी वकील उज्ज्वला रासकर यांनी १२ साक्षीदार तपासले. खटल्यात अपहृत मुलगी, फिर्यादी, एसटीडी बुथचालक, आवाजाचा फॉरेन्सिक लॅबोरेटरीचा अहवाल, सीडीआर अहवाल, ट्रॅप पंचनामा महत्त्वाचा ठरला. गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलिस निरीक्षक अशोक जगदाळे यांनी केला. त्यांना पोलिस उपनिरीक्षक आर. एस. शिंदे, सहायक पोलिस उपनिरीक्षक रफीक सय्यद, पोलिस नाईक ए. एन. केकान यांनी मदत केली.

**महाराष्ट्र टाइम्स** – दि. २३ सप्टेंबर, २०१९

# सीसीटीव्ही कॅमेरे चोरणाऱ्यांना अटक

## दत्तवाडी पोलिसांनी माग काढून पकडले

पुणे : पानमळा वसाहत ते दत्तवाडीदरम्यान गणपती विसर्जन घाटावर भाविकांच्या सुरिक्षततेसाठी महापालिकेच्या वतीने खासगी कंपनीकडून बसविण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे चोरणाऱ्या तिघांना दत्तवाडी पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून चोरलेले तीन कॅमेरे जप्त करण्यात आले आहेत.



रोहन विजय कांबळे (वय २६) आणि अक्षय विजय कांबळे (वय २३, दोघे रा. मदर तेरेसा गार्डनजवळ, दत्तवाडी) व लक्ष्मण प्रकाश जेटपाल (२८, रा. आंबेडकर वसाहत, दत्तवाडी) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. या प्रकरणी कंपनीचे व्यवस्थापक विलास कोल्हे (५३, रा. नांदेड सिटी) यांनी तक्रार दिली होती, त्यानुसार दत्तवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

शहरातील विविध विसर्जन घाटांवर भाविकांची गर्दी उसळते. कोणतीही अनुचित घटना घडू नये व नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी एका खासगी कंपनीच्या वतीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविले होते. विसर्जनानंतर कंपनीकडून कॅमेरे काढून घेण्याचे काम सुरू असताना अज्ञात चोरट्यांनी पानमळा वसाहत ते दत्तवाडी या दरम्यानच्या घाटावरील तीन सीसीटीव्ही कॅमेरे चोरून नेल्याचे समोर आले होते. दत्तवाडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक देविदास घेवारे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक कुलदीप संकपाळ, कर्मचारी तानाजी निकम, राजू जाधव, महेश गाढवे, अक्षयकुमार वाबळे यांच्या पथकाने आरोपींचा माग काढला. कारमधून आलेल्यांनी घाटावरील कॅमेरे काढून नेल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले. त्यावरून कार चालविणाऱ्याचा पत्ता शोधून, चौकशीत घाटावरील कॅमेरे चोरल्याचे त्याने कबूल केले. त्यांच्याकडून चोरलेले तीन सीसीटीव्ही कॅमेरे जप्त करण्यात आले आहेत.

# पत्नीचा गळा दाबून खून; पतीला जन्मठेप

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पत्नीचा खून केल्याप्रकरणी पतीला जन्मठेप आणि पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली. अतिरिक्त सत्र न्यायाधीश जी. पी. अग्रवाल यांच्या कोर्टाने हा निकाल दिला.

मोतीलाल हौसिलाल चव्हाण (वय २८, रा. गराडे सोमाडी रस्ता, ता. पुरंदर) असे शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पत्नी राजकन्या (वय २२) हिचा खून करण्यात आला. या खटल्याचे कामकाज सरकारी वकील सुनील मोरे यांनी पाहिले. त्यांनी आठ साक्षीदार तपासले. वैद्यकीय अधिकाऱ्यांची साक्ष आणि परिस्थितीजन्य पुरावा यात महत्त्वाचा ठरला. या प्रकरणाचा तपास सहायक पोलिस फौजदार महाजन यांनी केला. त्यांना सहायक पोलिस फौजदार शशिकांत वाघमारे, एस. एच. मोरे यांनी न्यायालयीन कामकाजात मदत केली.



मोतीलाल आणि राजकन्या यांचा विवाह २००५ मध्ये झाला. लग्नानंतर तिला सासरच्या मंडळींनी काही दिवस चांगले वागविले. त्यानंतर माहेरहून पैसे आणण्याची मागणी करू लागले. तिने वडिलांना सांगितल्यानंतर वडिलांनी काही पैसे पाठविले. त्यानंतर २०१६ मध्ये तिला मुलगी, दिरास मुलगा झाल्याने तिला त्रास देऊ लागले. त्या वेळी तिच्या वडिलांनी मुलीला सोन्याचे डूल दिले. ते कमी किमतीचे असल्याने तिला त्रास देण्यात आला. एप्रिल २०१७ मध्ये तिने वडिलांना सासरचे लोक त्रास देत असल्याचे फोन करून सांगितले. फोन अचानक बंद झाला. त्यानंतर रात्री तिला रक्ताची उलटी झाल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर ती मयत झाल्याचे तिच्या वडिलांना कळविण्यात आले. तिच्या वडिलांनी तिच्या सासरच्या लोकांवर तिला मारण्यात आल्याचा संशय व्यक्त केला. शवविच्छेदन अहवालात तिचा गळा आवळून खून झाल्याचे निष्पन्न झाले. तिच्या अंगावर ११ जखमा आढळून आल्या. पोलिसांनी पतीसह चौघांच्या विरोधात दोषारोपपत्र दाखल केले होते. या प्रकरणी इतर तिघांची निर्दोष मुक्तता करण्यात आली, तर पतीला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली.

## डॉक्टरांच्या बंगल्यात घरफोडी

औंध परिसरातील प्रसिद्ध डॉक्टर प्रमोद जोग परदेशात गेले असता त्यांचा बंद बंगला फोडून, पाच लाखांची रोकड व ८१ हजार रुपयांचे दागिने चोरून नेल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी चतुःश्रृंगी पोलिस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत डॉ. प्रमोद जोग (वय ६१, रा. आशियाना पार्क) यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार अज्ञात व्यक्तीच्या विरोधात चतुःश्रृंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार जोग औंध येथील आशियाना पार्क येथील स्वरूप बंगला येथे राहतात. १२ सप्टेंबर रोजी ते घर बंद करून, कुटुंबासह म्यानमारला गेले होते. त्या वेळी अज्ञात चोरट्याने त्यांच्या बंगल्याच्या दरवाजाचे कुलूप उचकटून आत प्रवेश केला. त्यांच्या बेडरुमच्या कपाटातील पाच लाखांची रोकड आणि ८१ हजार रुपयांचे दागिने असा ऐवज चोरट्यांनी चोरला. डॉ. जोग १९ सप्टेंबर रोजी परत घरी आल्यानंतर त्यांना घरफोडी झाल्याचे आढळून आले. त्यांनी तत्काळ याची माहिती चतुःश्रृंगी पोलिसांना दिली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. परिसरातील सीसीटीव्हीद्वारे आरोपींचा शोध घेतला जात आहे. या प्रकरणी उपनिरीक्षक संदीप चव्हाण अधिक तपास करीत आहेत.



TIMES OF INDIA - 14 September, 2019

# Police crack 2-month-old murders, arrest two men

Times News Network

**Pune:** The Pune rural police on Thursday arrested a duo for the murder of two men, whose charred remains were found in a car in Tamhini ghat in July this year.

The two deceased — Vijay Aba Salunke (32) of Banda in Sindhudurg district, and his brother-in-law Vikas Vilas Gosavi (28), a resident of Nipani in Karnataka — had been missing since July 30. Their bodies were found in the gutted car near Pimpri village on July 3.

Police said the arrested duo — Ashok Hilam (31) and Ganesh Waghmare (27), both from Mangaon in Raigad district — had killed Salunke and Gosavi in revenge.

According to the police, Hilam and Waghmare are involved in the illegal trafficking of the scales of pangolin, and khairi wood.

Salunke's brother Subhash, in a complaint with the Paud police, alleged that Hilam had dealings with his brother. Subhash alleged that Salunke and the suspects had a dispute over a deal in 2018.

Sometime later, in 2018, the Thane police had arrested the duo. "The duo held Salunke and Gosavi responsible for the arrests, and hatched a plot to murder them," inspector Padmakar Ghanwat said.

During the course of their investigation, the police received information about Hilam's whereabouts. Police went to Mangaon and took the duo into custody. Their accomplices are on the run.

Ghanwat said the suspects contacted Salunke and Gosavi about a good deal on pangolin scales. The two men left home on June 27, stayed for two days in a lodge at Mangaon, and left for Lonavla on June 30. "They picked up the suspects on the way to Tamhini ghat," Ghanwat said.

At Tamhini, the suspects and three accomplice — who were already waiting — thrashed the duo. "The suspects then garroted the duo to death and dumped their bodies in the car," Ghanwat said.

Police said the plan was to abandon the car with the bodies in Kundalika valley but the car broke down. The suspects set it on fire and fled the scene.

## DEAL GONE AWRY

**The arrested:** Ashok Hilam (31) and Ganesh Waghmare (27), both residents of Mangaon in Raigad district

**The charge:** Murdering Vijay Aba Salunke (32) and his brother-in-law, Vikas Vilas Gosavi

### A SORDID PAST

- The suspects were arrested by the Thane police last year for illegal trafficking in pangolin scales and khair wood
- According to an FIR, the suspects and Salunke had a dispute over some deal
- The duo suspected that Salunke was responsible for their arrest
- Promising the Salunke and Gosavi a good deal on pangolin scales, the suspects lured them to Tamhini ghat, murdered them and torched their car

### Duo found charred in car murdered earlier: Police

TOI report on July [illegible], 2019

Pune: The two persons found dead in a charred car in Tamhini Ghat section last week were murdered earlier and their bodies were dumped in the vehicle before it was set on fire. [illegible]

PuneMirror - 29 September, 2019

# 3 teens fake their kidnapping

## After bunking tuitions, they went around the city; they were scared of returning home late and thus cooked up a story

Gunwanti.Paraste
@timesgroup.com
TWEET @gunwantimirror

Three minors faked their kidnapping on Friday — as they feared a reprimand from their families — after bunking their tuitions and gallivanting throughout the city. Initially, they told their parents that three unknown people had abducted them, only to abandon them after three hours. In a state of panic, the parents approached the cops, who then scrutinised closed-circuit television (CCTV) footage of locations that were narrated by the three minors. With no result at hand, the cops turned suspicious by the minute. It was only after interrogating the children that they could crack the case.

The incident came to light around 8.30 pm. The three students aged 13-14 had bunked their classes and went about the city. After sunset, when they perhaps realised that it was too late to go home and that they may get yelled at, they hatched a plan to fake their kidnapping. From an unknown number they called their parents and claimed that they were abducted and were finally dropped at Tilak Chowk in Nigdi. When they were picked from the spot by their parents, they went to Chikhali police as the case fell under the jurisdiction of Rupinagar police chowky.

One of the parents told the cops that their kid went to tuition around 5.30 pm on Friday. He had told them that an unknown person came in a car and kidnapped him along with two girls. At 9.30, he had called his parents, saying that three unknown people had abducted him now dropped him back. The minor then requested the parents to pick him up. Based on these statements, the cops began an investigation. They checked the CCTV footage of the spots mentioned by the 13-year-old. However, they could not find a specific car at the locations.

Sub-Inspector Yogesh Shinde told *Mirror*, "We reached the spot as soon as we received the information and also scanned the CCTV footage. We did not find any kidnapping-related activity. So, we enquired with locals, who said that they were unaware of the case."

When they could not connect any points, the cops turned towards the children to ask them more questions. "There was something odd about their behaviour. They were not scared and instead behaved normally as if nothing had happened. This stoked our suspicion. When we interrogated them, one of the girls revealed that they had faked their kidnapping," Shinde added.

He said that the children confessed to making the plan since they were scared of going home that late after they had bunked their tuition, which they attend together. Now, the police are counselling the children, where they are told the importance of education and career. They were even told about the gravity of kidnapping — the consequences if it had happened for real. "They regret what they have done and have said that it would not happen again," the cop said.



SACHIN PHULSUNDAR

One of the kids said that they were dropped at Tilak Chowk, Nigdi. When cops checked CCTVs, no abduction-related activity was found

प्रभात – दि. १० सप्टेंबर, २०१९

# बँकांना गंडा घालणारा मास्टरमाईंड जेरबंद

## ७ वर्षांपासून आरोपी पोलिसांना देत होता गुंगारा

**प्रभात वृत्तसेवा**



**पुणे, दि. ९** - बनावट कागदपत्रांच्या आधारे कर्ज घेण्याच्या बहाण्याने विविध बँका व फायनान्स कंपन्यांना कोट्यवधींचा गंडा घालणाऱ्या टोळीच्या मुख्य सूत्रधारास गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने अटक केली.

बिपीन मुरलीधर पाटील (रा. सध्या ब्लुममफिल्ड सोसायटी, नऱ्हे-आंबेगाव) असे अटक केलेल्याचे नाव आहे. या प्रकरणी २५ ऑगस्ट २०१२ रोजी युनियन बँक काळेवाडी शाखा येथील बँक अधिकारी विजय बळीराम काळे यांनी हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार चौघांच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता.

१५ जून ते २५ ऑगस्ट या कालावधीत चौघांनी संगनमत करून गृह कर्ज घेण्याच्या बहाण्याने बनावट कागदपत्रे तयार करून समृद्धी कन्स्ट्रक्शनचे प्रोपरायटर नितीन गावडे यांच्या नावाने प्रेरणा बँकेत बनावट खाते तयार केले. युनियन बँकेतून २३ लाख ५० हजार रुपयांचे कर्ज घेऊन बँकेची फसवणूक केली. यापूर्वी या गुन्ह्यात संदीप वामनराव क्षिरसागर याला अटक करून त्याच्याविरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले होते. मात्र, यातील तिघेजण गुन्हा दाखल होताच फरार झाले. दरम्यान, या प्रकरणाचा तपास करण्यासाठी अप्पर पोलीस आयुक्त गुन्हे अशोक मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष पथक तयार करण्यात आले. पथकातील कर्मचारी नाईक व निंबाळकर यांना गुन्ह्याचा मास्टरमाईंड आरोपी बिपीन पाटील हा सध्या नऱ्हे-आंबेगाव परिसरात वास्तव्यास असून वेळोवेळी तो त्याची राहण्याची जागा बदलत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार परिसरात पथकाने सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. पुढील तपासासाठी आरोपीला हिंजवडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कामगिरी गुन्हे उपायुक्त बच्चन सिंह, सहायक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक महेश निंबाळकर, संभाजी नाईक, महेश पवार यांच्या पथकाने केली.

### बँकांसह फायनान्स कंपनीला गंडा

बिपीन पाटील याने त्याच्या इतर साथीदारांच्या मदतीने संगनमत करून अनेक बँक व फायनान्स कंपन्यांना बनावट कागदपत्रांच्या आधारे कर्ज घेण्याच्या बहाण्याने गंडा घातला. त्याच्याविरुद्ध डेक्कन पोलीस ठाण्यात वास्तू फायनान्स यांची ६८ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे तीन गुन्हे दाखल आहेत. तर लष्कर पोलीस ठाण्यात विजया बँकेला ३३ लाखांचा गंडा घातल्याप्रकरणी एक व वानवडी पोलीस ठाण्यात फस्ट ब्लु होम फायनान्सला ३३ लाख ५० हजाराला फसविल्याचा एक असे त्याच्यावर फसवणुकीचे ५ गुन्हे दाखल आहेत.

पुढारी – दि. ३ सप्टेंबर, २०१९

# सिगारेटच्या पैशांवरून टपरीचालकाचा खून

## बाणेरमधील थरारक घटना

**पुणे : प्रतिनिधी**

टपरी चालकाने सिगारेटचे पैसे मागितल्याने तिघांनी त्याचा खून केल्याची धक्कादायक घटना बाणेर परिसरात घडली. रविवारी सायंकाळी धारदार शस्त्रे घेऊन आलेल्या तिघांनी टपरी चालकावर सपासप वार केले. सोडविण्यास आलेल्या एकालाही जखमी केले गेले. वर्दळीच्या ठिकाणी अचानक घडलेल्या या प्रकाराने नागरिक घाबरून पळू लागले.

संतोष नरहरी कदम (वय ३२, रा. बाणेर, मूळ परभणी) असे खून झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी चतु:शृंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत रामप्रभू मोटे (वय ३९) यांनी फिर्याद दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संतोष हा मूळ परभणी जिल्ह्यातील रहिवासी आहे. फिर्यादींचा तो भाचा आहे. फिर्यादीचे म्हाळुंगे रस्त्यालगत असणाऱ्या डी-मार्टसमोर हॉटेल आहे. तर, संतोष याची स्वरा नावाने पानटपरी होती. रविवारी दुपारी दोनच्या सुमारास तिघेजण टपरीवर आले. त्यांनी संतोषला सिगारेट मागितली. सिगारेट दिली, त्याचे संतोषने पैसे मागितले. यावरून आरोपींनी त्याला शिवीगाळ करत तू आमच्याकडे पैसे मागतो. तुला माहीत नाही का आम्ही भाई आहोत ते, असे म्हणत वाद घातला. मात्र, फिर्यादीने मध्यस्ती करून हा वाद सोडवला. यानंतर आरोपी संतोषला जिवे ठार मारण्याची धमकी देत निघून गेले.

यानंतर सायंकाळी साडेपाचच्या सुमारास आरोपी हातात कोयता व गुप्ती घेऊन टपरीवर आले. त्यांनी वाद घालत संतोषला टपरीतून बाहेर काढले. यानंतर दोघांनी संतोषचे हात धरले; तर एकाने त्याच्या पोटात गुप्ती खुपसली. फिर्यादीची सासू व संतोषचा आवाज ऐकून फिर्यादी हॉटेलमधून पळत बाहेर आले व सोडविण्यास गेले असता एकाने त्यांच्यावरही कोयत्याने वार केले. त्यांनी वार चुकविल्याने ते वाचले; परंतु एक वार पाठीला लागला. यानंतर आरोपींनी गोंधळ घालून तेथून पळ काढला. गंभीर जखमी झालेल्या संतोषला येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले; परंतु रात्री उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

रविवार असल्याने सायंकाळच्या सुमारास टपरीसमोर नागरिकांची गर्दी होती. मात्र, अचानक घडलेल्या या प्रकारामुळे गोंधळ उडाला. नागरिक भीतीपोटी पळत सुटले होते. काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झालेले होते. ही माहिती मिळताच चतु:शृंगी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अद्याप या प्रकरणात कोणालाही पकडण्यात आलेले नसल्याचे सांगण्यात आले.

### आरोपीस बारा तासांत अटक

खून करून पसार झालेल्या आरोपींना गुन्हे शाखा व चतु:शृंगी पोलिसांनी बारा तासांत अटक केली. विशाल संजय शिंदे (१८, रा. रामकृष्ण मंगल कार्यालय, नवी सांगवी), प्रशांत श्रीशल कामसे (१८), सोमनाथ कल्याण चतुर ऊर्फ सोन्या (२२, रा. मुळशी) व अभिषेक लाला कोरडे ऊर्फ ब्लॉक्या (२३, रा. पिंपळे गुरूव, नवी सांगवी) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. शोध घेत असताना युनिट चारचे कर्मचारी विशाल शिर्के यांना आरोपींबाबत माहिती मिळाली होती. त्यानुसार चतु:शृंगी पोलिस ठाण्याचे सहायक निरीक्षक दत्तात्रेय शिंदे, गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक विजय झंझाड, कर्मचारी सुनील पवार तसेच विशाल सावळे, प्रकाश आव्हाड यांच्या पथकाने आरोपींना पकडले. यातील अभिषेक ऊर्फ ब्लॉक्या हा पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. त्याच्यावर घरफोडीसह इतर गुन्हे दाखल आहेत. दरम्यान, यातील आरोपी हे फरार होते; परंतु फिर्यादीने आरोपी पसार होताना त्यांच्या दुचाकीचा क्रमांक पाहिला होता. त्यामुळे आरोपी पकडण्यात पोलिसांना लवकर यश आल्याचे सांगण्यात आले.

पुढारी – दि. ५ सप्टेंबर, २०१९

# दोन कोटींच्या दरोड्यातील मुख्य सूत्रधार ४ वर्षांनी जेरबंद

## २०१५ पासून पोलिसांना देत होता गुंगारा

**पुणे : प्रतिनिधी**

चार वर्षांपासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या दरोड्याच्या गुन्ह्यातील मुख्य सुत्रधाराला गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने बेड्या ठोकल्या आहेत. संजय चंद्रकांत गंभीर असे त्याचे नाव आहे. गंभीर याने आपल्या इतर साथीदाराच्या मदतीने सेनापती बापट रोडवरील लाईफ जनरल इन्स्युरन्स कंपनीवर दरोडा टाकून ऑफिसमध्ये असलेली १ कोटी ९७ लाखाची रोकड चोरी केली होती. याप्रकरणी पोलिसांनी अगोदर ११ जणांना अटक केली होती. मात्र, संजय गंभीर हा अनेक दिवसापासून पोलिसांना गुंगारा देत होता.

शहरातील विविध गुन्ह्यात फरारी असलेल्या आरोपींच्या मुसक्या आवळण्यासाठी गुन्हे शाखेकडून सहाय्यक पोलिस आयुक्त शिवाजी पवार यांच्या देखरेखीखाली एक विशेष पथक स्थापन केले होते. गस्तीवर असताना या पथकातील पोलीस नाईक महेश निंबाळकर यांना संजय गंभीर हा बाणेर रोडवरील सकाळनगरमधील हॉटेल चारुज येथे येणार असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घतले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली.

यापुर्वी देखील संजय गंभीर याच्यावर बँक ऑफ महाराष्ट्रकडे जप्त केलेल्या मालमत्ता अर्ध्या किंमतीत मिळवून देतो, अशी बतावणी करुन १० साथीदारांसह नागरिकांना २ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात दाखल गुन्हा दखाल करण्यात आला होता. या प्रकरणात २०१२ मध्ये त्याला अटक देखील झाली होती. तसेच २०११ मध्ये टेक महिंद्रा कंपनीमध्ये नोकरी लावून देतो, असे सांगून लोकांकडून पैसे घेऊन फसवणूक केल्याबाबतचा गुन्हाही त्याच्यावर दाखल आहे. या गुन्ह्यात संजय गंभीर हा मागील ९ वर्षे फरार आहे. सदरची कामगिरी अपर पोलीस आयुक्त गुन्हे अशोक मोराळे, पोलीस उपायुक्त बच्चनसिंग, सहायक पोलीस आयुक्त डॉ.शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस नाईक महेश निंबाळकर, संभाजी नाईक, महेश पवार यांच्या पथकाने केली आहे.

### असा रचला दरोड्याचा कट

लाईफ जनरल इन्स्युरन्स अँड ब्रोकरेज, या सेनापती बापट रोडवरील कंपनीचे मालक साईराम अय्यर यांना कंपनीच्या कामासाठी मुंबईला नवीन ऑफिस घ्यायचे होते. त्या व्यवहारासाठी १ जून २०१५ रोजी २ कोटी रुपयांची रक्कम ऑफिसमध्ये आणली होती. ऑफिसमधील सेल्स कर्मचारी मनोज एलपूर (रा. पिंपरी) याला याची माहिती होती. त्याने मित्रांच्या मदतीने ही रक्कम चोरण्याचा कट रचला. ठरल्याप्रमाणे गंभीर व त्याच्या इतर साथीदारांनी ९ जून २०१५ रोजी सायंकाळी धाडसी दरोडा टाकून ऑफिसमधील १ कोटी ९७ लाखांची रोकड चोरुन नेली होती. चतु:श्रृंगी पोलिसांनी मनोज एलपूर, चंद्रकांत बेलवटे(रा.चिंचवड), अमित सांगळे (रा.निगडी) व इतर आठ अशा ११ जणांना अटक केली होती.

पुढारी – दि. ७ सप्टेंबर, २०१९

# ब्रँडेड वस्तू चोरणारी हँडसम गँग जेरबंद


## दिल्लीत ठोकल्या बेड्या; टोळीची 'हँडसम ग्रुप' नावाने ओळख; विमानाने विविध शहरांना जाऊन महागड्या वस्तूंवर करायचे हात साफ

**पुणे : प्रतिनिधी**

देशातील विविध शहरांमधील मॉलमध्ये जाऊन खरेदी करण्याच्या बहाण्याने हातचलाखी करत ब्रँडेड वस्तूंची चोरी करणाऱ्या दिल्लीच्या तिघांना गुन्हे शाखा युनिट चारच्या पथकाने स्थानिक पोलिसांच्या मदतीने दिल्लीतून अटक केली. आशीष कुशल बिस्त (३०), आकाश बालकिशन ढाका (२६), रवींदर अमरजितसिंग (३२, रा. तिघेही नवी दिल्ली) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. दिल्ली परिसरात आरोपींचा चांगलाच बोलबाला असून, हँडसम ग्रुप नावाने त्यांना ओळखले जाते. या टोळीत दहा ते बारा जणांचा समावेश असून, चोरी करण्यात या टोळीचा हातखंडा आहे.

मागील महिन्यात सेनापती बापट रोडवरील घड्याळाच्या दुकानातून घड्याळे खरेदी करण्याच्या बहाण्याने सेल्समनची दिशाभूल करत ५ लाख ४ हजार ८०० रुपयांच्या घड्याळांची चोरी केली होती. या प्रकरणी चतुःशृंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास करत असताना मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली तेव्हा आरोपी टुरिस्ट टॅक्सीने घटनास्थळी आल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार ओला टॅक्सीची माहिती घेऊन तपास केला असता, आरोपी मंगळवार पेठेतील लॉजवर राहिले असल्याचे समजले. त्यानंतर पोलिसांनी लॉजवर जावून पाहणी केली तेव्हा आरोपी दिल्लीहून विमानाने पुण्यात आल्याचे समजले.

पोलिसांनी विमानसेवा देणारी कंपनी व कॅब चालकाकडून माहिती घेतल्यानंतर यापूर्वी आरोपींनी शहरातील मोठ्या दोन नामांकित मॉलमध्ये चोरी करण्याचा प्रयत्न केला होता; परंतु त्यांना त्यात यश आले नाही म्हणून त्यांनी परत सेनापती बापट रोडवरील घड्याळाच्या दुकानात हात साफ केला. गुन्हे शाखेचे अपर पोलिस आयुक्त अशोक मोराळे यांच्या सूचनेनुसार निरीक्षक अंजूम बागवान यांच्या मार्गदर्शनात पथक तयार करून तपास सुरु केला असता, कर्मचारी ढवळे यांना पुण्यात चोरी करणारे आरोपी दिल्ली येथील असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी पाच दिवस आरोपी राहत असलेल्या परिसरात रेकी करून तिघांच्या मुसक्या आवळल्या. आरोपींकडे अधिक चौकशी केली तेव्हा या टोळीने दिल्ली, मुंबई, पुणे, बंगळुरू या शहरातील प्रसिद्ध मॉलमध्ये चोरी केल्याचे समोर आले. ही कामगिरी निरीक्षक बागवान यांच्या मार्गदर्शनात उपनिरीक्षक नीलेशकुमार महाडीक, कर्मचारी सचिन ढवळे, अशोक शेलार, शंकर पाटील, नीलेश शिवतरे, राजू मचे, गणेश काळे, शंकर संपते यांच्या पथकाने केली.



सीसीटीव्ही फुटेजमध्ये जेरबंद झालेले आरोपी.

### अशी करायचे चोरी

आरोपींना महागड्या वस्तू वापरण्याची सवय आहे. त्यामुळे शौक पूर्ण करण्यासाठी त्यांनी हातचलाखी करत देशातील काही प्रमुख मेट्रो सिटीतील मॉलमधील महागड्या वस्तू चोरण्यास सुरुवात केली. यासाठी आरोपी ज्या शहरात चोरी करण्यासाठी जायचे तेथे ते विमानाने जात असत, त्यानंतर एखाद्या लॉजमध्ये थांबत. पुढे चोरी करण्यासाठी मॉलकडे जाण्यासाठी ऑनलाइन ओला कॅब बुक करत. मात्र, चोरी करताना एका मॉलमधील कॅमेऱ्यात ते कैद झाले आणि पोलिसांच्या जाळ्यात अडकले. दिल्ली परिसरात त्यांच्या टोळीला हँडसम ग्रुप नावानेदेखील ओळखले जाते.

**पुढारी** – दि. ९ सप्टेंबर, २०१९

# ज्योतिषी असल्याचे सांगत पैसे उकळणारा तरुण अटकेत

## यूट्यूबवर केली ज्योतिषशास्त्राची जाहिरात

**पुणे : प्रतिनिधी**

यूट्यूबवर ज्योतिषशास्त्राची खोटी जाहिरात देऊन घरातील वादविवाद दूर करण्याच्या बहाण्याने फसविणाऱ्या राजस्थान येथील तरुणाला सायबर पोलिसांनी अटक केली. त्याने जवळपास ३० ते ३५ जणांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. शुभम सेतीया (वय २१, रा. भोप कॉलनी, श्रीगंगानगर) असे या संशयिताचे नाव आहे.

कोंढव्यातील महिलेने यूट्यूबर ज्योतिषशास्त्राची जाहिरात पाहिली होती. घरातील भांडणे व क्लेश चालू असतील तर ते दूर केली जातील, असे जाहिरातीत म्हटले होते. तसेच संपर्कासाठी क्रमांक दिला होता. फिर्यादी महिलेच्या घरात सतत वाद होत असत. यामुळे त्यांनी या क्रमांकावर संपर्क साधला. या वेळी त्या व्यक्तीने ज्योतिषी बोलत असून, सर्व पिडा दूर करतो असे सांगितले. महिलेने घरातील कौटुंबिक अडचणी सांगितल्यानंतर आरोपीने 'तुम पर काला जादू है' असे सांगत महिलेला भीती घातली. त्यासाठी महापूजा, होमहवन असे करावे लागेल, असे सांगत महिलेस पैसे पाठविण्यास सांगितले. त्यांनी १ लाख ६ हजार रुपये पाठविले, तरीही घरातील वाद सुरूच होते. तर ज्योतिषी सतत पैसे मागत होता. यामुळे त्यांना फसवणूक होत असल्याचे लक्षात आले. त्यांनी सायबर पोलिसांकडे तक्रार दिली होती.

पोलिसांनी ई-वॉलेट व मोबाइल तसेच तांत्रिक माहितीवरून आरोपीचा माग काढला. या वेळी तो राजस्थान येथून फसवणूक करत असल्याचे समोर आले. त्यानुसार सायबर सेलचे पोलिस उपायुक्त संभाजी कदम यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक जयराम पायगुडे, उपनिरीक्षक रवींद्र गवारी व पथकाने त्याला राज्यस्थान येथून अटक केली. त्याच्याकडून १ लाख सहा हजार रुपये व दोन मोबाइल जप्त केले आहेत. शुभम उच्चशिक्षित आहे. त्याने राजस्थान तसेच इतर शहरातील ३० ते ३५ नागरिकांची अशा पद्धतीने फसवणूक केली आहे. ज्योतिषी असल्याचे सांगून कोणाची फसवणूक झाली असेल, तर नागरिकांनी सायबर सेलकडे तक्रार करावी, असे आवाहन उपायुक्त संभाजी कदम यांनी केले आहे.

**पुण्यनगरी** – दि. ११ सप्टेंबर, २०१९

# मौजमजेकरिता वाहन चोरणारे दोघे जेरबंद

## हडपसर– मुंढव्यातून चोरल्या ९ दुचाकी

**पुणे : प्रतिनिधी**

मौजमजेकरिता ओएलएक्सवर गाड्यांचे फोटो अपलोड करून मोटारसायकल विकणाऱ्या उस्मानाबाद जिल्ह्यातील दोघांना हडपसर पोलिसांनी जेरबंद केले. त्यांच्याकडून ४ लाख ८५ हजार रुपये किमतीची नऊ वाहने जप्त केली आहेत.

शुभम सुधाकर गायकवाड (वय १९, रा. बेंदवाडी, फुरसुंगी; मूळ रा. आनाळा, ता. परांडा, जि. उस्मानाबाद) व सागर सुरेश जोगदंड (वय २३, रा. नारायणनगर, फुरसुंगी; मूळ रा. आनाळा, ता. परांडा, जि. उस्मानाबाद) अशी अटक केलेल्या दोघांची नावे आहेत. या दोघांवर वाहनचोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोटारसायकल चोरीचा तपास सुरू असताना हडपसर पोलीस स्टेशनचे पोलीस नाईक प्रताप गायकवाड आणि शाहिद शेख यांना वाहनचोरीतील आरोपी भेकराईनगर येथे येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सापळा रचून गायकवाड आणि जोगदंड यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे अधिक तपास केला असता, त्यांनी हडपसर पोलीस स्टेशन हद्दीतील आठ वाहनचोरी, मुंढवा पोलीस स्टेशन हद्दीतील एक वाहन चोरी केल्याची कबुली दिली.

हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हमराज कुंभार याच्या मार्गदर्शनाखाली संजय चव्हाण, युसूफ पठाण, संपत औचरे, राजेश नवले, प्रताप गायकवाड, सैदोबा भोजराव, विनोद शिवले, गणेश दळवी, अनिल कुसाळकर, अकबर शेख, शशिकांत नाळे, गोविंद चिवळे, अमित कांबळे, ज्ञानेश्वर चित्ते, विजय पवार यांच्या पथकाने ही कारवाई केली.

पुढारी – दि. १५ सप्टेंबर, २०१९

# मिरवणुकीत डल्ला; पाच टोळ्या जेरबंद

पुणे : प्रतिनिधी

गणेश विसर्जन मिरवणुकीतील गर्दीचा फायदा घेत भाविकांचे मोबाईल, सोनसाखळी आणि पाकिटांवर डल्ला मारणाऱ्या पाच टोळ्यांना फरासखाना पोलिसांनी जेरबंद केले. खास विसर्जन मिरवणुकीत चोऱ्या करण्यासाठी या टोळ्या बाहेरच्या राज्यांतून पुण्यात आल्याची माहिती पोलिस तपासातून समोर आली. या वेळी १४ आरोपींना पकडून ७ लाख ६२ हजारांचे ६० मोबाईल हस्तगत केले आहेत. त्यामध्ये ॲपल कंपनीच्या महागड्या मोबाईलचादेखील समावेश आहे.

यातील हरियाणातील महिलांच्या एका टोळीला फरासखाना पोलिसांनी जेरबंद केले असून, वर्धा व मुंबई येथील मोबाईल चोरांच्या चार टोळ्याही पकडल्या आहेत. दरम्यान गुन्हे शाखेने शुक्रवारी मालेगाव येथील १९ जणांच्या टोळीला अटक करून ८२ मोबाईल हस्तगत केले होते.

फरासखाना पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजवरून बेलबाग चौकात संशयितरीत्या फिरणाऱ्या सहा महिलांच्या एका टोळीला ताब्यात घेतले. त्या मूळच्या हरियाणा येथील असून, दिल्लीतून ट्रेनने विसर्जनाच्या आदल्या दिवशी पुण्यात दाखल झाल्या होत्या. त्या सोनसाखळी चोरण्यासाठी आल्या होत्या. या सर्वजणी बहीण, भावजय अशा एकाच नात्याच्या गोतावळ्यातील आहेत. त्यांच्याकडे अधिक तपास केला, तेव्हा त्यांनी फरासखाना पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या ५९ हजारांच्या सोनसाखळी चोरीची त्यांनी कबुली दिली.

- मोबाईल, सोनसाखळी, खिशातील पाकिटे चोरण्यात सराईत
- १४ आरोपींकडून ७ लाख ६२ हजार रुपयांचे ६० मोबाईल जप्त
- शहरातील लॉजवर टोळीचे एक महिना अगोदर वास्तव्य

ही कारवाई अपर पोलिस आयुक्त श्रीकांत तरवडे, पोलिस उपायुक्त स्वप्ना गोरे, सहायक पोलिस आयुक्त प्रदीप आफळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक जगन्नाथ कळसकर, पोलिस निरीक्षक नंदकिशोर शेळके, पोलिस उपनिरीक्षक यशपाल सूर्यवंशी, पोलिस कर्मचारी बापू खुटवड, सयाजी चव्हाण, केदार आढाव, अमर शिंदे, विशाल चौगुले, दिनेश भांदुर्गे, सचिन कुटे, सचिन सरपाले, मोहन दळवी, आकाश वाल्मीकी, अमेय रसाळ, मयूर भोकरे, पंकज देशमुख, राजू देवकर, अनिल गायकवाड यांच्या पथकाने केली.



अटक आरोपींसह पोलिसांचे पथक.

## एक महिना अगोदर काही प्रमुख ठिकाणांची पाहणी

अटक करण्यात आलेल्या काही टोळ्या विसर्जनाच्या एक दिवस अगोदरच शहरात दाखल झाल्या; त्यामुळे त्यांनी विसर्जन मार्गावरील काही ठिकाणांची पाहणी केल्याचादेखील अंदाज आहे. बहुधा त्यांना कोणत्या ठिकाणी मोठी गर्दी होते, याची माहिती असावी. यापैकी एक टोळी लॉजवर वास्तव्यास होती. विसर्जनादरम्यान फरासखाना पोलिस ठाण्यात मोबाईल, पाकीट आणि सोनसाखळी चोरीच्या ४१ तक्रारी दाखल झाल्या आहेत. तसेच एक महिला हरवल्याचीही तक्रार दाखल आहे.

**मोबाईल चोरीप्रकरणी एकास अटक**

गणेशोत्सव कालावधीत सिंहगड परिसरात मोबाईल चोरणाऱ्यास गुन्हे शाखेच्या युनिट एकने अटक केली. त्याच्याकडून एक मोबाईल जप्त केला आहे. विनोद बबन कासुर्डे (३२, रा. ता. दौंड) असे अटक केलेल्याचे नाव आहे. गणेशोत्सवात गर्दीचा फायदा घेऊन भाविकांचे मोबाईल चोरणाऱ्या टोळ्या सक्रिय झालेल्या असतात. शेकडो मोबाईल चोरीला जातात. याला आळा घालण्यासाठी यंदा गुन्हे शाखेला सूचना देण्यात आल्या होत्या. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार कासुर्डेला पकडण्यात आले. त्याच्याकडे अधिक तपास केला जात आहे.

> “ गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये चोऱ्या करण्यासाठी खास आंध्र, कर्नाटक, हरियाणासारख्या राज्यांतून चोरांच्या टोळ्या शहरात दाखल होतात. तसेच राज्यातील इतर जिल्ह्यांतूनही चोरांच्या टोळ्या दाखल होतात. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी अगोदर प्रतिबंधात्मक उपाययोजना करत सीसीटीव्ही तसेच पोलिसांची पथके तयार करून गुन्हेगारांवर लक्ष ठेवले होते. त्या आधारे हरियाणा येथील एका महिलेच्या टोळीला सोनसाखळीप्रकरणी जेरबंद करण्यात आले. तसेच मोबाईल, पाकीटमारी करणाऱ्या चार टोळ्यांनाही अटक केली. या टोळ्या मुंबई आणि वर्धा येथून आल्या होत्या. त्यांच्याकडून ६० मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत.
> **-जगन्नाथ कळसकर,** वरिष्ठ निरीक्षक, फरासखाना पोलिस ठाणे

**पुढारी** – दि. १८ सप्टेंबर, २०१९

# मुलीचे अपहरण करणाऱ्या दोघांना जन्मठेप

पुणे : प्रतिनिधी

**अकरा वर्षांपूर्वी बांधकाम व्यावसायिकाच्या दहा वर्षांच्या मुलीचे अपहरण करून ३० लाखांची खडणी मागणाऱ्या महिलेसह दोघांना अतिरिक्त सत्र न्यायाधीश ए. एन. सिरसीकर यांनी जन्मठेप आणि प्रत्येकी दोन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास दोघांनाही अतिरिक्त कारावास भोगावा लागेल, असेही न्यायालयाने निकाल देताना नमूद केले आहे.**

- ११ वर्षांनंतर सुनावली महिलेसह दोघांना शिक्षा
- ३० लाखांच्या खंडणीची केली होती मागणी
- अपहृत मुलीची साक्ष ठरली महत्त्वाची

राणी मोहन गायकवाड (३१, सहवास हॉल, सिंहगड रोड, मूळ गाव सावुर्ली, ता. खेड) आणि सुनीलकुमार रामविकास सिंग (३४, रा. शास्त्रीनगर, उत्तर प्रदेश) अशी शिक्षा झालेल्या दोघांची नावे आहेत. याबाबत मुलीच्या वडिलांनी विश्रामबाग पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. हा प्रकार १२ ते १३ जून २००८ दरम्यान ढंबऱ्या गणपती चौक येथे घडला. खटल्यात अतिरिक्त सरकारी वकील उज्ज्वला रासकर यांनी काम पाहिले. फिर्यादीच्या वतीने त्यांना ॲड. विजयकुमार सुपेकर यांनी मदत केली.

फिर्यादी यांचा बांधकाम व्यवसाय असून ते कर्वेनगर परिसरात राहतात. त्यांची सासूरवाडी सदाशिव पेठ असून घटनेच्या दिवशी सासूबाईंना बरे नसल्याने ते मुलीला घेऊन सदाशिव पेठेत आले होते. त्यावेळी सासूबाईंना दवाखान्यात घेऊन जायचे होते. त्यावेळी पीडित मुलीने त्यांच्याकडे चार रेघी वही आणण्यासाठी पैसे मागितल्यानंतर वडिलांनी तिला पैसे दिले. त्यावर वडिलांनी तिला शेजारी राहणाऱ्या आजींना घेऊन वही आणण्यास जा, असे सांगितले. वही आणण्यास गेल्यानंतर जवळच्या दुकानात तिला पाहिजे ती वही मिळाली नाही. म्हणून मुलगी अक्षर भंडार दुकानात एकटीच वही शोधत होती. वहीच्या बहाण्याने तेथून राणीने तिला अप्पा बळवंत चौकात आणले. येथून अपहरण करून तिला ओरिएंटल लॉज येथे घेऊन गेली. त्या ठिकाणी तिचा साथीदार सिंगही उपस्थित होता. हा प्रकार सायंकाळी सव्वासात ते साडेसातच्या दरम्यान घडला. त्यानंतर राणीने मुलीच्या वडिलांच्या मोबाईल एसटीडी बुथवरून फोन करून हिंदीमध्ये तुम्हारी बच्ची मेरे कब्जे मे है, म्हणत ३० लाख रुपयांची खंडणीची मागणी केली. त्यानंतर मुलीला सुखरूप परत दिले जाईल, असे म्हटले.

पोलिसांना सांगितल्यास मुलीला जिवे मारण्याची धमकी तिने दिली. दरम्यान, दोन वेगवेगळ्या नंबरवरून फिर्यादींना आलेल्या फोनवरून त्यांनी चौकशी केल्यानंतर दोन्हीही फोन पुणे स्टेशन परिसरातील असल्याचे त्यांना समजले. त्यानंतर पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार दिली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी राणीने पुन्हा फिर्यादींना फोन केला. त्यावर तिने पुन्हा ३० लाखांची मागणी केली. एवढी मोठी रक्कम गोळा करण्यासाठी थोडा कालावधी लागतो असे सांगून मुलीशी बोलणे करून देण्यास फिर्यादींनी राणीला सांगितले. त्यानंतर पोलिसांनी कॉल ट्रॅप करून सापळा रचून राणी व तिचा साथीदार सिंग याला अटक केली. खटल्यात अतिरिक्त सरकारी वकील उज्ज्वला रासकर यांनी १२ साक्षीदार तपासले. खटल्यात अपहृत मुलगी, फिर्यादी, एसटीडी बूथचालक, आवाजाचा फॉरेन्सिक अहवाल, सीडीआर अहवाल, ट्रॅप पंचनामा, महत्त्वाचा ठरला. गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलिस निरीक्षक अशोक जगदाळे यांनी केला. त्यांना पोलिस उपनिरीक्षक आर. एस. शिंदे, सहायक पोलिस उपनिरीक्षक रफीक सय्यद, पोलिस नाईक ए. एन. केकान यांनी मदत केली. पुराव्यामध्ये एकसूत्रता आढळल्याने न्यायालयाने जन्मठेप सुनावताना आरोपींना योग्य ती शिक्षा दिल्याचे ॲड. विजयकुमार सुपेकर यांनी सांगितले.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार

## चंदनगर पोलिसांच्या तत्परतेने नराधमाला काही तासांतच अटक

**वडगाव शेरी, ता. २५ : शाळा सुटल्यानंतर घरी परतणाऱ्या एका शाळेतील अल्पवयीन मुलीवर एका रिक्षावाल्याने धाक दाखवून पळवून नेऊन बलात्कार केल्याची घटना मंगळवारी (ता. २४) खराडी येथे घडली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता चंदनगर पोलिसांनी तातडीने तपास पथक रवाना करून सहा तासांत आरोपीला जेरबंद केले.**

अटक केलेल्या आरोपीचे नाव नितीन भागवत बंगाळ (वय २१, रा. आव्हाळवाडी) असे असून त्याच्यावर बालअत्याचार प्रतिबंध कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर आरोपी शाळेत जाणाऱ्या अल्पवयीन मुलीला रोज पाहायचा. मंगळवारी त्याने त्या मुलीवर पाळत ठेवून तिला जबरदस्तीने रिक्षात बसवून तोंडाला पट्टी बांधून खराडी येथे नेऊन अत्याचार केला. त्यानंतर पीडित मुलीला

» गुन्हे वृत्त

आरोपीने गणेशनगर भागात सोडून दिले. घाबरलेल्या मुलीने प्रसंगावधान दाखवत घरी फोन केला. पालक मुलीजवळ पोहोचल्यानंतर त्यांनी चंदनगर पोलिसांशी संपर्क साधला.

चंदननगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शंकर कटके, साहाय्यक पोलिस निरीक्षक गजानन जाधव, प्रदीप सोनवणे, तुषार आल्हाट, तुषार खराडे, चेतन गायकवाड या तपास पथकाने क्षणाचाही विलंब न लावता प्रकरणाचा छडा लावला.

हा आरोपी रिक्षा भाड्याने घेऊन व्यवसाय करतो. सदरची घटना घडल्यानंतर आरोपी फरार झाला होता. मात्र, पोलिसांनी शिताफीने त्याला आळंदीजवळील डुडुळगाव येथे सापळा रचून रात्री अटक केली.

### दोघा लुटारूंकडून आणखी गुन्हे उघड

**वाघोली :** वाघोलीत एका तरुणाला लुटणाऱ्या दोन लुटारूंना लोणीकंद पोलिसानी ताब्यात घेतल्यानंतर त्यांनी केलेले आणखी गुन्हे उघडकीस आले आहेत. त्यांच्याकडून सुमारे ८० हजार रुपयांचा मुद्दे माल जप्त करण्यात आला आहे.

वाघोली येथील रिलायंस मार्ट समोर विशाल भारती (रा. युनिक रेसिडेन्सी) याना राजेश सीताराम देवकर (वय २५), विशाल भारत पाटोळे (वय १८) यांनी चाकूचा धाक दाखवून लुटले होते. पोलिसानी दोघांना ताब्यात घेतल्यानंतर अधिक चौकशी केली असता राजेश हा अट्टल गुन्हेगार असल्याचे समजले.

डी बी पथकाने अधिक चौकशी केली असता हडपसर (मेगासेंटर) येथून करिझ्मा दुचाकी चोरल्याचे तसेच खराडी येथे एका रिक्षा चालकाला कोयत्याचा धाक दाखवून लुटल्याचे उघडकीस आले आहे. त्यांच्याकडून चोरीची करिझ्मा दुचाकी व गुन्ह्यात वापरलेली ज्युपिटर दुचाकी व चोरीचे मोबाईल पोलिसांनी जप्त केले आहेत. सराईत देवकर याच्यावर हडपसर, कोंढवा, वानवडी येथे पाच चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

Sakal Times - 3 September, 2019

# Shopkeeper killed for asking money for cigarette; 3 held

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**PUNE:** A 32-year-old paan shop owner was allegedly killed by three persons when he demanded money for one cigarette, which they had purchased. The incident took place in Baner on Sunday evening. Police have arrested the three accused.

The deceased has been identified as Santosh Narhari Kadam, who used to operate Swara Paan Shop adjacent to Karan hotel opposite DMart in Baner. His maternal uncle Ramprabhu Rangnath Mote (39), a native of Parbhani district, and owner of Karan hotel, sustained injuries while trying to save him. Mote has lodged an FIR with Chatuhshrungi police against the three accused persons.

As per police, around 2.30 pm on Sunday, three persons went to the paan shop and one of them asked for a cigarette. Kadam gave him the cigarette and asked for money. However, one of them slapped him saying he should not ask for money from them as they are 'Bhai' of the area. Mote intervened and the three of them went away after threatening them of dire consequences.

## Incident

"Around 5.15 pm, I was inside my hotel when I heard screams of Kadam and his mother-in-law. I saw the same three men who had earlier quarrelled with him in the afternoon. Two of them were holding Kadam's hands while the third one stabbed him with a dagger. When I went to save him, one of the accused attacked me with a chopper and I sustained injuries on my hands. They terrorised other people by waving choppers. The accused fled when one of my workers rushed towards them with a big stone. As they fled on a motorcycle towards Pune university chowk, I remembered its registration number," Mote stated in his complaint. They were rushed to a private hospital in Aundh, where Mote was discharged after receiving first aid. Kadam who was admitted in ICU ward succumbed to his injuries at around 10 pm.

## Case cracked within 12 hours

Soon after the incident, officials from Crime Branch unit 4 and the Detection branch of Chatuhshrungi police station identified the attackers, after getting leads from the bike number. Acting on a tip-off received by Crime Branch's policemen Datta Phulsundar and Vishal Shirke, a team led by Police Inspector Anjum Bagwan nabbed Vishal Shinde and Prashant Kamse in Sangvi around 3 pm on Monday. Two others Somnath Kalyan Chatur (21) and Abhishek Lala Korde (21) were nabbed by Chatuhshrungi police station team. Police inspector Vaishali Galande is further investigating the case.

सामना – दि. १० सप्टेंबर, २०१९

# बँकांना गंडा घालणारा म्होरक्या जेरबंद

पुणे, दि. ९ (प्रतिनिधी) – शहरातील विविध बँकांसह फायनान्स कंपनीकडून बनावट कागदपत्राच्या आधारे कर्ज घेऊन कोटींचा गंडा घालणाऱ्या टोळीच्या मुख्य सूत्रधाराला गुन्हे शाखेने जेरबंद केले.

बिपीन मुरलीधर पाटील (रा. नऱ्हे, आंबेगाव) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी युनियन बँकेच्या काळेवाडी शाखेतील अधिकारी विजय बळीराम काळे यांनी ऑगस्ट २०१२ मध्ये हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

गृह कर्ज घेण्याच्या बहाण्याने बनावट कागदपत्रे तयार करून

## सात वर्षांपासून पोलिसांना देत होता गुंगारा

बिपीन पाटीलने युनियन बँकेची २३ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केली होती. यापूर्वी संबंधित गुन्ह्यात संदीप वामनराव क्षीरसागरला अटक करून त्याच्याविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले होते. मात्र, गुन्हा दाखल होताच तिघेजण फरार झाले होते. दरम्यान, या प्रकरणाचा तपास करण्यासाठी अपर पोलीस आयुक्त गुन्हे अशोक मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष पथक तयार करण्यात आले होते. त्यानुसार गुन्ह्याचा मास्टर माइंड पाटील नऱ्हे-आंबेगाव परिसरात वास्तव्यास असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून पाटीलला ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. अधिक तपासासाठी पाटीलला हिंजवडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कामगिरी पोलीस उपायुक्त बच्चन सिंह, सहायक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक महेश निंबाळकर, संभाजी नाईक, महेश पवार यांच्या पथकाने केली.

## विविध पोलीस ठाण्यांत पाच गुन्हे दाखल

बनावट कागदपत्रांच्या आधारे बँकांना गंडा घालण्यात पाटील सराईत आहे. त्याच्या विरुद्ध डेक्कन पोलीस ठाण्यात वास्तू फायनान्स यांची ६८ लाख रुपायांची फसवणूक केल्याचे तीन गुन्हे दाखल आहेत, तर लष्कर पोलीस ठाण्यात विजया बँकेला ३३ लाखांचा गंडा घातल्याप्रकरणी एक व वानवडी पोलीस ठाण्यात फर्स्ट ब्लू होम फायनान्सची ३३ लाख ५० हजारांची फसवणूक असे मिळून फसवणुकीचे पाच गुन्हे दाखल आहेत.

# गिफ्टच्या बहाण्याने फसवणूक

पुणे, दि. २८ (प्रतिनिधी) – लग्नाच्या आमिषाने महिलेला गिफ्ट पाठविल्याची बतावणी करून २८ हजार ५०० रुपयांचा गंडा घालणाऱ्या दोघा नायजेरियन तरुणांना सायबर विभागाने दिल्लीतून जेरबंद केले.

## दोन नायजेरीयन तरुणांना अटक

गॉडसन विल्सम ओसेई (वय २९) आणि चुकवुईमेका लेव्ही मबनेफो (वय २७, दोघेही रा. तुघलकाबाद, दिल्ली मूळ-नायजेरिया) अशी अटक केलेल्यांची नावे आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आंबेगाव पठार परिसरात एका महिलेला मेट्रोमोनियल साइटवरून अविनाशकुमार नावाने प्रोफाइल तयार करून फ्रेंड रिक्वेस्ट पाठविण्यात आली होती. त्यानुसार महिलेने रिक्वेस्ट स्वीकारली. त्यानंतर भामट्यांनी महिलेस लग्नाचे आमिष दाखवून विमानतळावर गिफ्ट पाठविल्याची बतावणी करत २८ हजार ५०० रुपये ऑनलाइन वर्ग करून घेतले. मात्र, फसवणूक झाल्याचे महिलेच्या लक्षात आल्याने त्यांनी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार तपास करताना दोघेही भामटे दिल्लीत राहत असल्याची माहिती आर्थिक व सायबर विभागाला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून त्यांना ताब्यात घेतले. ही कामगिरी पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांच्या मार्गदर्शनाखाली मच्छिंद्र पंडित, गंगाधर घावटे, मोहिते, राजकुमार जाबा, बाबासो कराळे, शाहरुख शेख यांच्या पथकाने केली.

# अभिप्राय...

प्रति,

मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो.
सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे शहर
यांना सविनय सादर,

प्रतिवेदक :- आर.के.गोसावी, पोलीस हवालदार ५३८८, सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे

विषय :- दर्पन पुस्तकासंदर्भात अभिप्रायबाबत.

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती नागरिकांना समजावी या उद्देशाने पोलीस ठाणे येथे दैनंदिनी कामकाज करीत असताना झालेल्या चांगल्या कामगिरीबाबतची प्रेसनोट जनसंपर्क अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर यांचे कार्यालयात सादर करणेबाबत दिलेल्या आदेशाप्रमाणे पोलीस ठाणे येथे आठवडाभरामध्ये झालेल्या चांगल्या कामगिरीची प्रेसनोट सादर करण्यात येत असुन सदरची प्रेस नोट वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यानंतर सदरचे पेपर कात्रनाची कटिंग करुन त्या पासुन दर्पन हे पुस्तक तयार करण्यात आले आहे. सदरचे पुस्तक हे ठाणे अंमलदार कक्षामध्ये ठेवण्यात येत असुन पोलीस ठाणे येथे येणारे नागरिकांना सदरचे पुस्तक वाचण्यासाठी देण्यात येत असते.

दर्पन या पुस्तकामुळे पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीची माहिती एकत्रीतपणे वाचण्यासाठी उपलब्ध झालेली असुन दर्पन पुस्तक वाचल्यानंतर नागरिक हे पोलीसांचे चांगल्या कामाचे कौतुक करत आहे. नागरिकांच्या मनामध्ये पोलीसांविषयी चांगल्या प्रकारची भावना निर्माण होत आहे. तसेच पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांचेही मनोबल वाढलेले असुन ते ही चांगली कामगिरी करुन आपले नाव व फोटो वर्तमान पत्रामध्ये येवुन त्याचे कात्रण दर्पण पुस्तकामध्ये समाविष्ट होणेसाठी चांगली कामगिरी करण्याचे प्रयत्न करीत आहेत.

मा. सादर व्हावे,
दि. १८/०६/२०१९

( आर.के.गोसावी )
पोलीस हवालदार ५३८८
सिंहगडरोड पोलीस ठाणे पुणे शहर.

---

प्रति,

मा. पोलीस आयुक्त सो,
पुणे शहर
यांना सविनय सादर

रिपोर्ट :- के एस पलांडे पोलीस शिपाई ८५६४ चंदननगर पोलीस स्टेशन पुणे शहर
यांजकडुन विनंती पुर्वक की,

विषय :- दर्पण पुस्तिकेच्या अभिप्रायाबाबत...

महोदय,

/- उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मी चंदननगर पोलीस स्टेशन या ठिकाणी ०३ वर्षांपासुन नियुक्तीस असुन सायबर विभागामध्ये काम करत आहे. मा.पोलीस आयुक्त सो यांनी दर्पण पुस्तीकेच्या माध्यमातुन पोलीसांनी केलेली कामे, गुन्हयाचा लावलेला शोध, जेष्ठ नागरिकांना केलेली मदत व गुन्हास प्रतिबंध होणेसाठी केलेल्या उपाययोजना तसेच सामान्य नागरीकांना येणाऱ्या अडचणी कशा सोडवाव्या या सदंर्भात केलेले मार्गदर्शन केले आहे. तसेच पोलीसांनी केलेल्या कामचे प्रशिस्ती प्रत्रक दपर्ण या पुस्तीकेच्या माध्यमातुन समाजासमोर मांडले आहे. त्यामुळे पोलीस व सामान्या नागरीकामध्ये चांगले सबंध तयार होत आहेत. त्यामुळे दर्पण ही पुस्तीकेचे पोलीस स्टेशनला येणारे नागरीक खुप कौतुक करत आहेत.

दर्पण पुस्तीका पोलीसांनी केलेल्या कामाचा सन्मानाबाबत मा.पोलीस आयुक्त सो. यांचे खुप खुप अभिनंदन. माननियांना सादर

तरी सदर माहिती अवलोकन व आदेशार्थ सविनय सादर.

मा.सादर व्हावे
दि. १६/०५/२०१९

पोलीस शिपाई ८५६४
चंदननगर पोलीस स्टेशन पुणे शहर


चुकलेला मुलगा विसावला आईच्या कुशीत
At junctions of Smart City, an 'intelligent' syste
to help manage Pune's many traffic problems
आयुक्तांकडून कॉन्स्टेबलला
मिळाले 'सरप्राईज गिफ्ट'
गुन्हे शाखेने ८०
लाखांचे हस्तिदंत
पकडले
नदीत पडलेल्या मुलाचे पोलिसांनी वाचविले प्राण
तब्बल २२ वर्षे फरार असलेल्यास केले जे
स्थानबद्धतेतून सराइतांवर पोलिसांच
व्हिडिओ कॉल सुरु ठेवून आत्महत्येचा प्रयत्न
वक्तृत्वाने व्यक्तिमत्त्व होते समृद्ध
चोरांची टोळी अटके
८२ मोबाइल जप्त
तत्काळ मदतीला धावून
पोलिसांनी वाचवले प्राण
नदीत उडी मारलेल्या
तरुणाला वाचवले
द्विवादाची जोपासना करा
तंबाखूजन्य पदार्थ
भाणणाऱ्यांवर कारवाई
दागिनेचोर जेरबंद
ILLEGAL SAND TRANSPORTATION
Driver arrested for stealing trucks
attached by revenue dept officials
डॉक्टरच्या वेशातील वाहनचोरास अटक
गुन्हेगार जेरबं
वाघाच्या कातड्याची तस्करी
बेकायदा पिस्तूल
बाळगणारा अटकेत
दोन दिवसांत ३७५ कोयते जप्त
पिस्तुलाची हौस पडली महागात!